मा० विशेष महासभा दि. १३/०५/२०१५

# निर्देश पत्र
## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय

मा. विशेष महासभा दि. १३/०५/२०१५ [redacted]
[redacted]. दुपारी २.३० वाजता
मा. विशेष महासभा सूचना क्र. ०१
दि. ०५/०५/२०१५ (मुळप्रत)

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

(प्रकरण क्र. ०१ ते ०३ पर्यंत)

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

(१)

१५/१६

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०५/०५/२०१५.

## मा. विशेष महासभा

**मा. विशेष महासभा सूचना क्र. :- ०१, दिनांक ०५/०५/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. १३/०५/२०१५ रोजी दुपारी २.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. ०५/०५/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. विशेष महासभा सुचना क्रमांक ०१, दि. ०५/०५/२०१५ सोबतची विषय पत्रिका**
**सभा बुधवार दि. १३/०५/२०१५**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ०१ | उत्तन घनकचरा प्रकल्प या ठिकाणी असलेली शेड भाड्याने देणेबाबत. |
| ०२ | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकरण करणे. |
| ०३ | मालमत्ता कर आकारणी व वसुली बाबत आढावा घेणे. |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०५ मे २०१५

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १३/०५/२०१५

## //गोषवारा//

**प्रकरण क्र. ०९ :- उत्तन घनकचरा प्रकल्प या ठिकाणी असलेली शेड भाडयाने देणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन घनकचरा प्रकल्पाच्या जागेत महानगरपालिकेची शेड आहे. सदर शेड यापूर्वी ५० मेट्रीक टन कचरा प्रकल्पातंर्गत सन २००३ मध्ये बांधण्यांत आली होती. तद्नंतर सदर शेडच्या छपराचे काम परीवहन उपक्रमातंर्गत कार्यशाळेसाठी वापरण्यासाठी करण्यांत आले. तथापी सदर ठिकाणी कार्यशाळा करण्यास संबंधितांनी नकार दिल्याने सद्यस्थितीत सदर शेड वापराविना पडून आहे. सदर शेडचे एकूण क्षेत्रफळ १८१०.०० चौ. मिटर असुन चालु बाजारभावानुसार (Ready Recknor) सदर शेडच्या जागेचे वार्षिक रु.१९,४४,०००/- एवढे भाडे होत आहे. सदर शेड वापरण्यासाठी भाडयाने दिल्यास महानगरपालिकेस उत्पन्न मिळून शेडची देखभाल होवू शकेल. तरी त्यास जाहिर लिलाव काढण्यांस मंजुरी असावी.

महानगरपालिकेचे स्थावर व जंगम मालमत्ता भाडयाने देण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण ठरविणे आवश्यक आहे. चालु बाजारभाव (Ready Recknor) निश्चित करण्यासाठी द्विस्तरीय समिती नियुक्त केली आहे. त्यात कार्यकारी अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) व नगररचनाकार (नगररचना विभाग) यांचा समावेश आहे. चालु बाजार भावाच्या मुल्यावर जाहिर लिलाव करुन आलेले देकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार वेळोवेळी मा.स्थायी समिती सभेची मंजुरी प्राप्त करुन घेणेत येणार आहे. तसेच यापुढे महानगरपालिका मालकी हक्काच्या स्थावर /जंगम मालमत्ता चालु बाजारभाव किमतीप्रमाणे (Ready Recknor) भाडयाने देण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क), (ड) व (इ) नुसार मा.आयुक्तांना अधिकार देण्यात यावेत.

सबब उपरोक्त प्रस्ताव मान्यतेस्तव शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका
21/05/15

गोषवारा प्राप्त दि २२/०४/२०१५ वेळ ११:२५

मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र..... ३ ..................

लिपीक

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १३/०५ /२०१५

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ०२ :- अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर मा.न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा.आयुक्त यांनी दिलेल्या मंजुरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर डॉ.संजीवकुमार उत्तमराव गायकवाड यांची वैद्यकीय अधिकारी या स्थायी पदावर दि.२१/०६/२०१० रोजी व श्री. योगेश चिंतामण शिंदे यांची फार्मासिस्ट या स्थायी पदावर दि.२९/०५/२००७ रोजी नेमणूक करण्यात आलेली आहे.

डॉ.संजीवकुमार उत्तमराव गायकवाड, वैद्यकीय अधिकारी व श्री. योगेश चिंतामण शिंदे, फार्मासिस्ट यांना सेवेतून निलंबीत करण्यापूर्वी ते मिरा भाईंदर महानगरपालिका, आरोग्य केंद्र काशिगांव, मिरारोड (पूर्व) येथे कार्यरत होते.

तक्रारदार श्री. उमाकांत घरटे, यांनी पोलीस उप-अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे/पालघर या कार्यालयाकडे दाखल केलेल्या तक्रारीवरुन रचण्यात आलेल्या लाचेच्या सापळयात डॉ. संजीवकुमार उत्तमराव गायकवाड, वैद्यकीय अधिकारी व श्री. योगेश चिंतामण शिंदे, फार्मासिस्ट यांना दि.११/०९/२०१४ रोजी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आलेले होते. त्यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम ७,१२,१३ (१) (ड) सह १३(२) अन्वये काशिमिरा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर ।। ४५/२०१४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरच्या कर्मचाऱ्यांना दि.१२/०९/२०१४ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून निलंबीत केलेले आहे.

लाचलूचपत प्रतिबंधक महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस उप-अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पालघर या कार्यालयाने, लाचलूचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार लोकसेवक डॉ.संजीवकुमार उत्तमराव गायकवाड, वैद्यकीय अधिकारी व श्री. योगेश चिंतामण शिंदे, फार्मासिस्ट यांचे विरुध्द विशेष न्यायालयात उपरोक्त अपराधाबद्दल अभियोग दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरीची आवश्यकता असल्याचे कळविले होते.

महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर खटला भरण्याची मागणी पोलीसांकडून किंवा शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजूरी देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५९ (अ) प्रमाणे महानगरपालिका आयुक्त सक्षम आहेत. याअनुषंगाने महानगरपालिका आयुक्त यांनी उक्त अधिनियमातील कलमान्वये, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, वरळी, मुंबई यांस न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणेस दि.१६/०३/२०१५ रोजी मंजूरी दिलेली आहे.

वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५९ (अ) मधील तरतुदी प्रमाणे मा.महासभेस अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ९/४/२०१५ वेळ २.४०

मा. स्थायी ~~समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ०२

लिपीक

नगरसचिव विभाग.